


Savitribai Phule Pune University Affiliation ID. No. PU/PN/ASC/036/1977
Jr. College Code No.: J-11.08.001 M.C.V.C. Code No.: P-057

ounder - President
ate Sahebrao V. Buttepatil
Ex.M.L.A.,Khed

|| प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप: ||
K.T.S.P. Mandal's

Website : www.hrmrajgurunagar.com
Email : hrmrajguru@yahoo.com




# HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA


h. : 02135-222099

**ARTS, SCIENCE & COMMERCE**
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune - 410505
NAAC Reaccredited B++ Grade

* Principal*
Dr. Shirish S. Pingale
M.Sc.Ph.D


प्रती
मा.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
पुणे विद्यापीठ

विषय - श्रेणी सुधार (improvement of class /grade)योजनेअंतर्गत परीक्षेचे आवेदन पत्र /अर्ज ऑफलाईन पद्धतीने सादर करण्या बाबत ----------------

महोदय,

आपले संधर्भ -परिपत्रक क्र १८२ /२०२४ (संदर्भ - EXAM /S&T/1480 दिनांक १२/०९/२०२४ नुसार आमच्या महाविद्यालयातील बी..एस्सी मधील एका विद्यार्थ्याने अर्ज केला होता त्या बाबत चे पत्र तसेच ऑफलाईन अर्ज डी डी आम्ही विद्यापीठास दिले आहे तरी आम्ही जमा केलेल्या पत्राची ओसी आपणा कडे आपल्या परिपत्रकानुसार माहितीसाठी पाठवत आहोत

प्राचार्य,डॉ.एस.एस.पिंगळे

Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.

व मूल्यमापन मंडळ
खिंड, पुणे – ४११ ००७
ध्वनी क्र. (०२०) २५६२ १३४६
Website: www.unipune.ac.in

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411 007
Phone: (020) 2562 1346
E-mail: boe@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा / एस ॲण्ड टी / 1151

दिनांक: 17 / 10 / २०२४

प्रति,

मा. विभागप्रमुख / संचालक,
सर्व शैक्षणिक विभाग / केंद्र
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये /
मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय : श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेअंतर्गत परीक्षेचे आवेदन पत्र/अर्ज ऑफलाईन पध्दतीने सादर करणेबाबत......

संदर्भ : परिपत्रक क्र. १८२/२०२४
(संदर्भ : Exam/S&T/1480, दि. १२/०९/२०२४)

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय परिपत्रकास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय परिपत्रकान्वये श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेसंदर्भातील विद्यापीठ अध्यादेश १६८ मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून सदरहू अध्यादेश हा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेअंतर्गत विविध पदवी, पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर, २०२४ परीक्षेचे आवेदन पत्र / अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरावयाचे असून अशा परीक्षांचे अर्ज प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील पी.डी.एफ. डाऊनलोड करून विद्यापीठ प्रचलित नियमांच्या अधीन राहून योग्य शुल्कासह भरून परीक्षा विभाग येथे महाविद्यालयामार्फत जमा करावेत.

उपरोक्त परीक्षांचे आवेदन पत्रं/अर्ज हे सुधारित अध्यादेश १६८ मध्ये नमूद केलेले विद्यापीठ नियमांचे काळजीपूर्वक अवलोकन करून व संबंधित विद्यार्थ्यांना / परीक्षार्थ्यांना अवगत करून सर्व संबंधित पात्र विद्यार्थी / परीक्षार्थी यांचेकडून वरीलप्रमाणे ऑफलाईन पध्दतीने भरून घेऊन विहित मुदतीत विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक आहे. तसेच सदरबाबत काही बदल झाल्यास ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील / केंद्रातील पात्र विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपले परीक्षा आवेदन पत्र / अर्ज हे विहित शुल्कासह संबंधित विभागात / केंद्रात विहित वेळेत सादर करावेत. मा. विभागप्रमुख / संचालक यांनी विद्यापीठ प्रचलित नियमाप्रमाणे संबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन करून निकाल परीक्षा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावा.

सदर पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा ही ऑक्टोबर, २०२४ हिवाळी सत्रातील विद्यापीठ नियमित परीक्षेबरोबर चालू असलेल्या अभ्यासक्रमाच्या पॅटर्ननुसार / समकक्षतेनुसार आयोजित करण्यात येत आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमातील समकक्ष विषय विचारात घेऊन परीक्षेस प्रविष्ट व्हावे.